# भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे क्रांतिकारी चळवळीतील योगदान

प्रा. योगेश अशोक गांगुर्डे
इतिहास विभाग प्रमुख
कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय कळवण (मानूर)

## प्रस्तावना :( Indtroduction)

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचा पहिला टप्पा ( 1885 ते 1905) हा मवाळ कालखंड म्हणून ओळखला जातो. ब्रिटीशांच्या न्याय बुद्धीवर विश्वास ठेवून या काळात भारतीय नेत्यांनी आपली कार्य केले. पण आपले हक्क व मागण्या मान्य होत नाहीत याची कल्पना आल्यावर ( 1905 नंतर) राष्ट्रीय सभेत कलियुगाचा आरंभ झाला. अर्ज विनंत्या यावर विश्वास न ठेवता आंदोलक सरकारच्या धोरणावर टीका करणे, आंदोलन करणे आदी मार्गांचा अवलंब करू लागले. पण याच काळात देशासाठी यांच्या नसानसात शौर्य उसळत होते असे तरुण प्रसंगी बलिदान देण्यासाठी पुढे सरसावले. तेही याच काळात..... सशस्त्र मार्गाचा अवलंब करून ब्रिटिशांना हिंदुस्थानातून हुसकावून लावणे यासाठी जाळपोळ, लुटालुट, बॉम्बस्फोट, गोळीबार करणे, रेल्वेमार्ग उखडविणे, पोस्ट तारायंत्रे उध्वस्त करणे या क्रांतिकारी मार्गाचा अवलंब केला.

या क्रांतिकारी मार्गाने ब्रिटिश सरकारची दोन हात करण्यामागे हिंदुस्तान मधील विद्यार्थी घटक हा मोठ्या संख्येने पुढे सरसावला. प्राण्यांची कुठलीही पर्वा न करता हसत हसत त्याने मरणाला कवटाळले. अशा विद्यार्थी वर्गाने हिंदुस्थानाच्या स्वतंत्र आंदोलनात क्रांतिकारी मार्गाने जो लढा दिला तो या शोध निबंधात मांडला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे:- (Objective)

1. विद्यार्थ्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत जे क्रांतिकारी कार्य केले, ते क्रांतिकारी कार्य नेमके काय होते हे समजावून घेणे.
2. क्रांतिकारी कार्यात विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग वाढविण्यासाठी नेमक्या कुठल्या मार्गाचा अवलंब केला गेला ते तपासणे.

3. क्रांतिकारकांनी ब्रिटिशांच्या अन्याय अत्याचाराविरोधात केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.
4. विद्यार्थ्यांनी एकत्र येण्यासाठी केलेल्या संघटनांचा अभ्यास करणे.

**संशोधनाचे महत्त्व** (Importance)

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात हिंदुस्थानातील जनतेने भिन्नभिन्न मार्गाचा अवलंब करून ब्रिटिशांना भारताला स्वातंत्र्य देण्यास भाग पाडले. पण सर्वात धाडशी व धोके पत्करून समोर मोठी दहशत पसरून त्यांना हुसकावून लावण्यासाठी जो अभिनव मार्ग साकारला तो क्रांतिकारी मार्ग होय. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी ब्रिटिशांच्या अन्यायाविरोधात शस्त्र उगारले ते खरोखरच स्तुत्य आहे विद्यार्थ्यांनी हे कार्यकर्त्यांना जात-पात, धर्मभेद विसरून एकत्र येऊन यशस्वी लढा दिला हे प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व.

**गृहितके :-** (Hypotheses)

1.स्वातंत्र्य प्राप्तीसाठी क्रांतिकारी मार्ग हा ही एक यशस्वी मार्ग ठरला आणि या मार्गात महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले .

2. क्रांतिकारक विद्यार्थ्यांचे संघटन करण्यासाठी महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या अनेक क्रांतिकारी संघटनांनी महत्त्वाची भूमिका निभावली.

3. ब्रिटिश सरकारला विद्यार्थी क्रांतिकारकांच्या कारवायांमुळे मोठ्या दहशतीच्या सावटाखाली वावरावे लागले.

**संशोधनाचा विश्लेषणात्मक आढावा :-**

**महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या क्रांतिकारी चळवळीचा प्रवाह** :-

भारताला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी सशस्त्र मार्गाचा अवलंब करण्याच्या तत्वाला लोकमान्य टिळकांसारख्या जहाल विचारांच्या नेत्यांनी कधीच विरोध केला नाही. ही टिळकांच्या मते सशस्त्र मार्गाचा अवलंब हाही एक व्यवहार्य भाग आहे. या मार्गाने जाताना टिळक सुद्धा कमालीची काळजी घेत होते. त्यामुळे इंग्रज अधिकाऱ्यांचे खून किंवा बॉम्बस्फोट घडून आणण्याचे प्रयत्न असल्यास हिंसक प्रकारांशी टिळकांचा अप्रत्यक्ष संबंध असल्याचा संशय असला तरीपण ते न्यायालयात सिद्ध होणार नाही याची टिळक दक्षता घेत होते.

लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेतून अठरा विशीतील विद्यार्थी तरुणांनी परकिय सत्तेवर प्रहार करून गुप्त संघटना निर्माण केल्या होत्या. या विद्यार्थ्यांमध्ये गजानन

पाठक, लक्ष्मण शर्मा, पांडुरंग खानखोजे आदींनी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस नागपूर व वर्धा येथे “आर्य बांधव समाज” ही गुप्त संघटना स्थापन केली. वर्धा येथे “बाल समाज” तर नागपूरला “समर्थ शिवाजी समाज” या नावाखाली या या संघटना काम करत असे. अशा प्रकारच्या अनेक संघटना संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत होत्या.

ज्या संघटनांमधील विद्यार्थी व्यायाम करण्यासाठी तालमीत जात, कुस्ती इत्यादी मैदानी खेळ खेळत. गणेश जयंती, शिवजयंती ती उत्सव साजरी करणे, देशभक्तीवर संचार लि पुणे करणे आधी विविध उपक्रम या ग्रुप संघटनांमधील तरुणांनी सुरू केले. त्यांच्या कार्यामुळे अतिशय कमी वयाच्या तरुणांनी देश मुक्त करण्यासाठी जणूकाही रान पेटवलेले दिसून येते. या गुप्त संघटनांमध्ये अगोदर तरुणांची पारख करून मगच त्यांना निवडक सभासदांच्या यादीत समावून घेतले जात असे व त्यांना गुप्त संघटनेची शपथ दिली जात असे.

**गुप्त मंडळांची रचना** :-

या संघटनेत सामील झालेल्या तरुणांची रचना ही मोठ्या वर्तुळातून लहान वर्तुळात मग त्यापेक्षाही लहान वर्तुळात अशा प्रकारे केली जात. सर्वात लहान वर्तुळात एकूण चार किंवा पाच सदस्य असत. एक जण प्रमुख असत. त्याचे उरलेले सदस्य आदेश मानत. संघटनेचे प्रमुख तत्व शक्य शक्य तेवढी गुप्तता हे होते. या संघटनांना मदत करण्यासाठी असंख्य भारतीय पुढे येत. ते आपापल्या परीने मदत करत. काही त्यांना पैसा पुरवत तर काही फरारी क्रांतिकारकांना आसरा देत असे.

**चाफेकर क्लब** :-

पुण्यामध्ये सन 1896 ला चाफेकर बंधू, दामुअण्णा भिडे, महादेव रानडे यासारख्या तरुणांनी एकत्र येऊन पुणे या ठिकाणी चाफेकर क्लबची स्थापना केली. सन 1896 या दुष्काळाने थै मान घातलेले असताना मुंबई व पुण्यात प्लेगची साथ आली. याकाळात राज्यकर्त्यांची बेपर्वाही,जनतेचे होणारे हाल, अधिकाऱ्यांचे दुर्वर्तन यामुळे विद्यार्थी तरुणांची मने पेटून उठली. प्लेग निवारणाच्या नावाखाली ब्रिटिश अधिकारी पुणे-मुंबईतील जनतेवर अत्याचार करू लागले. या तरुणांची माथी भडकली. त्यांनी मि.रँड या अधिकाऱ्याच्या हत्येचा कट रचला व तो प्रत्यक्षात आणला. 22 जून 1897 रोजी मि. रँड व त्यांच्या सहकारी आयर्स्ट चा चाफेकर बंधू यांनी खून केला द्रविड बंधू सहकारी ब्रिटिशांच्या आमिषाला बळी पडले. त्यांनी सरकारला चाफेकर बंधूंची नावे सांगितली. त्यामुळे दामोदर चाफेकर सापडले.

त्यांना लगेच फासावर लटकविले तर वासुदेव चाफेकर यांनी ब्रिटीशांना माहिती पुरविणाऱ्या द्रविड बंधूंचा खून केला. अखेर तेही सापडले. चौकशी सुरू झाली. या प्रकरणांमध्ये लोकमान्य टिळक यांनी सरकारच्या दमन नीतीचा निषेध करून ' सरकारचे डोके ठिकाणावर आहे का ? ' असा खडा सवाल केसरी वृत्तपत्रातून केला. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व पेटुन उठला. शिवाय चाफेकरबंधूंना फाशी देण्यात आली त्यातून विनायक दामोदर सावरकर या कोवळया वयातील तरुणाने शिक्षण घेत असतानाच हाती शस्त्र घेऊन देश हा आदर्श मूक्त करण्याचा मार्ग अवलंबिला. 1900 मध्ये त्यांनी तरुणांची एक गुप्त संघटना 'मित्रमेळा' नाशिक (भगूर) येथे स्थापन केली.

इसवी सन 1900 मध्ये स्थापन झालेल्या ' मित्रमेळा' या संघटनेचे रूपांतर 1904 मध्ये ' अभिनव भारत' असे करण्यात आले. या संघटनेत दिवसेंदिवस तरुणांची संख्या वाढतच गेली. या या संघटनेचा विस्तार होऊन 39 शाखा स्थापन झाल्या.1906 मध्ये विनायक दामोदर सावरकर इंग्लंडला गेले. तेव्हा या संघटनेचे कार्य बंधू बाबाराव सावरकर यांच्याकडे आले. सावरकर इंग्लंड येथे असताना 1857 'स्वातंत्र्यसमर' व ' जोसेफ मॅझिनीचे चरित्र' हे दोन ग्रंथ लिहिले. हे दोन ग्रंथ या काळात तरुण क्रांतिकारकांना धर्मग्रंथात प्रमाणे वाटू लागले. या संघटनांशी संबंधित काही तरुणांनी अर्धवट शिक्षण सोडून बॉम्ब बनविण्याची कला अवगत करून मुंबई, पुणे, पेन, वाई इत्यादी ठिकाणी बॉम्ब तयार करण्याचे कारखाने उघडले.

**अभिनव भारत संघटनेची कार्य** :-

ब्रिटिशांच्या भारतातील नोकशाही मध्ये दहशत निर्माण करण्यासाठी व सरकारी अधिकाऱ्यांच्या जुलमी कामकाजाबद्दल त्यांचे खून करणे हा या संघटनेचा मुख्य उद्देश होता. असाच एक नोकर कलेक्टर जॅक्सन न्यायाधीशाने चुकीच्या पद्धतीने न्यायदान केल्यामुळे 21 डिसेंबर 1909 रोजी अनंत लक्ष्मण कान्हेरे या नाशिकच्या पण औरंगाबाद या ठिकाणी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी नाशिकला येऊन जास्त चा खून केला. तसेच जॅक्शन ला या पक्षपाती निर्णयात मदत करणारा कर्जन वायली याचा खून बदल लाल धिंग्रा या तरुणाने इंग्लंडला जाऊन केला. या दोन्ही तरुणांना फाशीची शिक्षा सुनावली गेली. या प्रकरणात विनायक दामोदर सावरकर यांना दोषी ठरवून त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. तर या संघटनांशी संबंधित अनेक तरुणांची धरपकड करून सर्वांना कमी-अधिक प्रमाणात शिक्षा सुनावली गेली.

**निष्कर्ष** :- (Conclusion)

भारतीय स्वातंत्र्याच्या काळात भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी महाराष्ट्रियन विद्यार्थी वर्गाने आपली घरेदारे सोडून देश सेवा हीच ईश्वर सेवा मानून देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. शिक्षणासाठी घराबाहेर पडलेले तरुण राष्ट्रवादाने प्रेरित झाले व ब्रिटिशांच्या अन्याय, अत्याचारातून देश मुक्त करण्यासाठी क्रांतीचा मार्ग स्वीकारला. विविध संघटनांची स्थापना केली. काही तरुण अशा संघटनांमध्ये सामील झाले. आपले वय जरी कमी असले तरी आपले ज्ञान, ताकद, बुद्धीचा वापर करून देश स्वातंत्र्य मिळविण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

**समारोप**:-

अशाप्रकारे भारतातील सर्व घटकांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले असले तरी यात महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे विचारांचे क्रांतिकारी योगदान असल्याचे विशेष नमूद होते. देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी सळसळत्या रक्ताच्या तरुणांनी जी कमालीची एकता, शौर्य, धैर्य, दाखविले आहे ते अविस्मरणीय आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या कार्यात या तरुणांचे स्थान खरोखरच ध्रुव ताऱ्याप्रमाणे आहे.

**संदर्भसूची** :- (Bibliography)


1. फडके य. दि., शतकातील महाराष्ट्र खंड - 3, के सागर प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती-2013.
2. य. दि. फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र-4, के सागर प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती-1993.
3. य. दि. फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र-5, के सागर प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती 2008.
4. य. दि. फडके, केशवराव जेधे, श्री विद्या प्रकाशन पुणे, 1982.
5. केळकर श्रीपाद, असहकाराचे आंदोलन, प्रकाशन पुणे, 2003.
6. कंटक प्रेमा, सत्याग्रही महाराष्ट्र, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, 1940